# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 03 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०३ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- भविष्यातल्या आव्हानांसाठी नवी पिढी घडवण्यावर नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भर दिल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र अभिवादन–नायगाव इथलं नियोजित स्मारक पाच वर्षांत पूर्ण करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- शेतीच्या नुकसानाचं आता उपग्रहाव्दारे सर्वेक्षण–केंद्रीय कृषीमंत्र्यांची माहिती

आणि

- बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या अंतिम सामन्यातही भारताची कामगिरी निराशाजनक

****

भविष्यातल्या आव्हानांसाठी नवी पिढी घडवण्यावर नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अधिक भर दिल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज दिल्लीत झोपडीवासियांसाठी बांधलेल्या सदनिकांचं लोकार्पण, वीर सावरकर महाविद्यालयाची पायाभरणी तसंच केंद्रीय शिक्षण मंडळाच्या नवीन विस्तारित परिसराचं लोकार्पण केल्यानंतर नागरिकांशी बोलत होते. वैद्यकीय आणि अभियांत्रिकीचं शिक्षण आपल्या मातृभाषेतून घेणं विद्यार्थ्यांना शक्य असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले –

***हमे सिर्फ बच्चों को सिर्फ पढाना ही नही है, बल्की वर्तमान और भविष्य की जरूरतों के लिए नई पिढी को तयार करना है। नई नॅशनल एज्युकेशन पॉलिसी मे इसी बात का ध्यान रखा गया है। नई राष्ट्रीय शिक्षा निती गरीब परिवार का बच्चा हो, मध्यम परिवार की संतान हो***

***अब वो अपनी मातृभाषा मे पढकर के डॉक्टर भी बन सकता है। इंजिनियर भी बन सकता है। और बडी से बडी अदालत में मुकदमा भी लड सकता है।***

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४व्या जयंतीनिमित्त पंतप्रधानांनी त्यांना अभिवादन केलं. महिला सक्षमीकरणाच्या जननी आणि शैक्षणिक तसंच सामाजिक सुधारणा क्षेत्रातल्या अग्रणी असलेल्या सावित्रीबाईंचं कार्य सतत प्रेरणा देत असल्याचं, पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतींना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. या निमित्तानं शैक्षणिक संस्थांसह विविध सामाजिक संस्था-संघटनांच्या वतीनं आदरांजलीपर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

सावित्रीबाईंच्या जन्मगावी, सातारा जिल्ह्यातल्या नायगाव इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. यावेळी बोलतांना मुख्यमंत्र्यांनी फुले दाम्पत्याच्या कार्याला उजाळा दिला. ते म्हणाले –

***या समाजामध्ये विषमता दूर करून समतेचं बीजारोपण झालं पाहिजे आणि समाजातल्या स्त्रीयांना जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, याची मुहूर्तमेढ जर कोणी केली असेल तर ती महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केली. ज्या ज्या प्रथा महिलांना महिला म्हणून जगण्याकरता थांबवत होत्या, त्या सगळ्या प्रथांच्या विरूद्ध क्रांतीची ज्योती त्यांनी पेटवली. आणि समाजामध्ये परिवर्तन करून दाखवलं.***

माजी मंत्री छगन भुजबळ, इतर मागास आणि बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. गेल्या कार्यकाळात

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नायगाव इथं घोषणा केलेलं सावित्रीबाईंचं स्मारक त्यांच्या द्वी शताब्दी जयंतीपूर्वी तयार करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलं. या स्मारकासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रिया तत्काळ सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी साताऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले –

***स्मारक हे केवळ पुतळ्यापुरतं मर्यादित नाहीये. स्मारक पुतळ्यांसोबत विचारांचंदेखील झालं पाहिजे, आणि मी आपल्याला यानिमित्ताने शब्द देतो, की निश्चितपणे अशा प्रकारचं जे स्मारक आहे, ते याठिकाणी आम्ही पूर्ण करून दाखवू. बरोबर पाच वर्षांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची द्विशताब्दी सुरू होणार आहे. त्या द्विशताब्दीपूर्वी हे स्मारक तयार ठेवलं पाहिजे. जिल्हाधिकारी तुम्हाला मी जबाबदारी देतो यातलं पहिलं काम दहा एकर जमीन अधिगृहीत करण्याकरता तात्काळ कारवाई सुरू करा.***

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी पदाच्या अंतिम निकालात महाज्योती संस्थेतून मुलींमध्ये राज्यात प्रथम आलेल्या मैत्रेयी अविनाश जमदाडे हिचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

****

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी मंत्रालयात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केलं.

छत्रपती संभाजीनगर इथं औरंगपुरा परिसरात सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी तसंच नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केलं. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीणा यांच्यासह अनेक अधिकारी तसंच कर्मचारी यावेळी उपस्थित होते. फेस ऑफ आंबेडकराइट मुव्हमेंट या सामाजिक संस्थेच्या वतीने महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या आणि पेनचं वाटप करण्यात आलं.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त परभणी इथं कृषी विज्ञान केंद्रात महिला मेळावा घेण्यात आला. जालना इथं गांधीचमन चौकात आमदार अर्जुन खोतकर यांच्यासह मान्यवरांनी सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. लातूर इथं जिल्हा कोषागार कार्यालयात जिल्हा कोषागार अधिकारी डॉ.उज्ज्वला पाटील यांनी सावित्रीबाईंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

हिंगोली जिल्हा महिला आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिला मेळावा घेण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जिल्ह्यातील जास्त कर्ज मिळालेल्या गटांचा तसंच ग्रामीण भागात उत्कृष्ट काम करणारे सीआरपी अर्थात समुदाय संसाधन प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

नांदेड इथं औद्योगिक प्रशिक्षण केंद्राजवळ सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं.

****

मराठवाड्याच्या हक्काच्या कृष्णा खोऱ्यातील पाण्याबाबत पुढच्या आठवड्यात बैठक घेऊन सर्व आढावा घेणार असल्याचं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे. ते आज तुळजापूर इथं पत्रकारांशी बोलताना सांगितलं. ‘दुष्काळ तिथे पाणी’ यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात नदी जोड प्रकल्प हाती घेतला असून यामुळे कुठेच दुष्काळ भासणार नाही, असं सांगत लवकरच धाराशिव जिल्ह्यात पाणी येईल अशी ग्वाही पाटील यांनी दिली.

****

शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या नुकसानाचे आता उपग्रहाद्वारे सर्वेक्षण केलं जाणार असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. ते आज नाशिक इथं यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कृषी विकास केंद्रात किसान संवाद मेळाव्यात बोलत होते. उपग्रहाद्वारे सर्वेक्षणामुळे नुकसानाचं अचूक मोजमाप होऊन शेतकऱ्यांना अपेक्षित भरपाई मिळू शकेल असा विश्वास चौहान यांनी व्यक्त केला. ते म्हणाले –

***फसल खराब हुई तो सॅटेलाईट के आधार पर रिमोट सेन्सिंग से इमेज लेंगे। फसल के नुकसान का आकलन करेंगे। और वो आकलन परफेक्ट होगा और जितना नुकसान होगा फसल का, उत्पादन कम होगा, उसका आकडा होगा सीधा किसान के अकाऊंट मे डीबीटी के माध्यम से डाल दिया जायेगा।***

****

क्रिकेट

सिडनी इथं सुरु असलेल्या बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अंतिम सामन्यात आज पहिल्या दिवसअखेर यजमान संघानं एक बाद नऊ धावा केल्या असून, हा संघ १७६ धावांनी पिछाडीवर आहे. दरम्यान, या कसोटीत भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, पण संघाची कामगिरी निराशाजनक झाली. भारताचा पहिला डाव १८५ धावांवर संपुष्टात आला. ऋषभ पंतने सर्वाधिक ४० धावा केल्या. रविंद्र जडेजानं २६, जसप्रित बुमराहनं २२, तर शुभमन गीलने २० धावा केल्या आहेत.

****

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाच्या कामांना गती द्यावी असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. तालुका निहाय मंजूर प्रकल्पासाठी जमीन उपलब्धतेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. ज्या ठिकाणी प्रकल्प उभारणी शक्य नसेल, अशा ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित तहसीलदारांना दिले.

****

महाराष्ट्र पोलिस स्थापना दिनानिमित्त लातूर इथं दोन दिवसीय पोलीस प्रदर्शनाचं राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते उद्घाटन झालं. पोलिस दलाच्या कामकाज जाणून घेण्यासाठी नागरिकांनी तसेच सर्वच विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहावं असं आवाहन रहाटकर यांनी केलं. या प्रदर्शनात पोलिस दलातल्या विविध विभागांची माहिती आणि शस्त्र पाहता येणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने येत्या सहा जानेवारीला दर्पण दिनाचं औचित्य साधून प्रसारमाध्यमात कार्यरत १५१ जणांचा गौरव करण्यात येणार आहे. महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी ही माहिती दिली. मुद्रित, श्राव्य आणि दृक श्राव्य माध्यमात कार्यरत सर्वांचा यावेळी गौरव केला जाणार असून यात महिला पत्रकारांसह छायाचित्रकारांचाही सहभाग असल्याचं नाईक यांनी सांगितलं.

****

हिंगोली जिल्ह्यातील नांदूर इथल्या ग्रामस्थांनी विशेषत: महिलांनी आज जिल्हा परिषदेवर घागर मोर्चा काढला. जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेतून ग्रामस्थांना पाणीपुरवठा करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

****